# मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८.

कलम ५१[१] अन्वये, ग्रामपंचायतीकडे निहित झालेली मालमत्ता पुनर्ग्रहण करण्याचे शासनाचे अधिकार.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
परिपत्रक क्र. व्हीपीएम-१७८१/१०४२६/के. नं. १४२८/२२.
मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२. दिनांक:- १२, मार्च, १९९२.

वाचावे:- १] शासन अधिसूचना ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीए-१२७०/५३१३८-ई, दिनांक ८.१२.१९७०.
२] शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग, क्र. व्हीपीएन-१७६९/२४६३/ए/७६-तेवीस, दिनांक २१.८.७६ आणि
३] शासन आदेश ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएन-१७६९/२४६३-ए/७६/तेवीस दिनांक २१.८.१९७६.

परिपत्रक:-

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ५१[१] च्या तरतुदी अन्वये राज्य शासनाच्या मालकीच्या ग्रामपंचायतीकडे निहित झालेल्या जमिनी कोणत्याही राष्ट्रीय/राज्य विकास योजनांच्या प्रयोजनासाठी किंवा कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असल्यास, राज्य शासनाला सदर अधिनियमाच्या कलम ५१[१-अ]अन्वये पुनर्ग्रहण[रिझ्युम ] करता येतात. सदर अधिनियमाच्या कलम ५१[१-अ] प्रमाणे असलेले राज्य शासनाचे अधिकार वर प्रस्तावनेत क्र. [१] येथे नमूद केलेल्या अधिसूचनेअन्वये , जिल्हाधिका-यांना मर्यादित स्वरूपात शासनाने प्रत्यायोजित [डेलीगेटेड] केलेले आहेत. ग्रामपंचायतीकडे ज्या कारणासाठी शासकीय जमिनी निहित केलेल्या आहेत, त्या कारणासाठी त्या जमिनीची आवश्यकता नसल्यास अशा जमिनी शासनाकडे परत घेताना जिल्हाधिका-यांनी त्या अधिकारांचा वापर करावयाचा आहे. या अधिकारांचा वापर करण्यापूर्वी शासकीय जमीन पुनर्ग्रहण करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतीने ठरावाद्वारे सहमती दर्शवावयाची असते.

२. कोल्हापूर जिल्ह्यातील एका प्रकरणात शासनाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, ग्रामपंचायतीने ठरावाद्वारे १ एकर जमीन पुनर्ग्रहण करण्यास मान्यता दिली असताना, जिल्हाधिका-यांनी सार्वजनिक प्रयोजनासाठी [पोलीस चौकीसाठी] ४ एकर जमीन पुनर्ग्रहण केली. अशा प्रकारे जिल्हाधिका-यांनी

...री कार्यालय
...गिरी.
...AR.1992
७२४९

त्यांना प्रत्यायोजित केलेल्या अधिकारांचा मर्यादेच्या उल्लंघन [गैरवापर] केलेला आहे. वस्तुत: सार्वजनिक प्रयोजनासाठी ४ एकर जमिनीची आवश्यकता असताना ग्रामपंचायतीने त्या क्षेत्रात मंजुरी न दिल्यामुळे ते प्रकरणे जिल्हाधिका-यांनी शासनाकडे पुढील आदेशासाठी पाठविणे आवश्यक होते. दिनांक ८. १२. १९७० च्या अधिसूचनेद्वारे जिल्हाधिका-यांना प्रत्यायोजित केलेले शासनाचे अधिकार हे मर्यादित स्वरूपातच जिल्हाधिका-यांनी वापरावयाचे आहेत. ही बाब जिल्हाधिका-यांनी नजरेआड करून चालणार नाही.

३. वरील प्रकरणाची पुनरावृत्ती होऊ नये या दृष्टीने याद्वारे सर्व जिल्हाधिका-यांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ५१[१-अ] अन्वये असलेल्या शासनाच्या अधिकारांचा वापर दिनांक ८. १२. १९७० च्या अधिसूचनेद्वारे प्रत्यायोजित केलेल्या अधिकारांच्या मर्यादेत राहूनच वापर करावा. जर एखाद्या ग्रामपंचायतीने सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असलेल्या शासकीय जमिनीच्या पुर्नग्रहणास विरोध केली किंवा आवश्यक असलेल्या क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र पुर्नग्रहण करण्यास ठरावाद्वारे सहमती दर्शविली तर अशा प्रकरणी पुर्नग्रहणाबाबत शासनाच्या वतीने निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हाधिका-यांना देण्यात आलेला नाही. त्यामुळे असे प्रकरण त्यांच्या स्पष्टीकरणात्मक अहवालासह शासनाकडे [महसूल व वन विभाग ] पुढील निर्णयार्थ पाठवावे व त्या प्रकरणी शासनाचा निर्णय झाल्यानंतरच शासकीय मालकीच्या जमिनी पुर्नग्रहण करण्याची कारवाई जिल्हाधिका-यांनी करावी.

४. वरील सूचनांचे जिल्हाधिका-यांनी काटेकोरपणे पालन करावे.

५. सदर परिपत्रक महसूल व वन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ भि. वी. जोशी ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति